दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १४५ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


## आजचे पंचांग

मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, शिशिर ऋतु, माघ मास, कृष्णपक्ष, अमावास्या संध्याकाळी ५-३१ पर्यंत नंतर प्रतिपदा तिथी, दिवस नक्षत्र-धनिष्ठा रात्री ९-१६ पर्यंत योग- परिघ रात्री १२-२९ पर्यंत नंतर शिव, करण- नाग संध्याकाळी ५-३१ पर्यंत

## पुणे विद्यापीठाचा दणका

**पुणे** : महापालिकेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांतील रिक्त जागांच्या मुद्द्यावर कठोर भूमिका घेतल्याने संस्थाचालकांचे धाबे दणाणले आहे. ज्या महाविद्यालयांमध्ये किमान ५० टक्के मान्यताप्राप्त प्राध्यापक कार्यरत नसतील, त्या महाविद्यालयांना २०२६-२७ साठी प्रथम वर्षाचे प्रवेश घेता येणार नाहीत, असा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठाने कंबर कसली आहे.

## सारांश वृत्त

### पंतप्रधान मोदी इस्रायलला भेट देणार

**जेरुसलेम :** पंतप्रधान नरेंद्र मोदी २५ ते २६ फेब्रुवारी दरम्यान दोन दिवसांच्या इस्रायल दौऱ्यावर जाणार आहेत, अशी माहिती सूत्रांनी सोमवारी दिली. रविवारी प्रमुख अमेरिकन ज्यू संघटनांच्या अध्यक्षांच्या परिषदेला संबोधित करताना इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी मोदींच्या भेटीची बातमी सर्वप्रथम दिली. "संसदेत भाषण. पुढच्या आठवड्यात कोण येत आहे? नरेंद्र मोदी," असे नेतान्याहू यांनी सभेला सांगितले.

### तारिक रहमान यांचा आज शपथविधी

**ढाका :** बांगलादेशाच्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाला दणदणीत विजय मिळवून दिल्यानंतर तारिक रहमान मंगळवारी बांगलादेशचे नवे पंतप्रधान म्हणून शपथ घेतील. जुन्या परंपरेला तोड देत, ६० वर्षीय बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या अध्यक्षांचा शपथविधी समारंभ बंगभवनऐवजी संसद संकुलाच्या दक्षिण प्लाझा येथे होणार आहे. मंगळवारी दुपारी राष्ट्रीय संसदेच्या दक्षिण प्लाझा येथे राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन नवीन मंत्रिमंडळ सदस्यांना शपथ देतील, असे सरकारी बीएसएस वृत्तसंस्थेने सोमवारी वृत्त दिले.

### वंदे मातरमला विरोध करणे देशद्रोह

**लखनौ :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सोमवारी म्हटले की, वंदे मातरमला "विरोध" करणे आणि राष्ट्रीय प्रतीकांविरुद्ध "अपमानजनक टिप्पणी" करणे हे देशद्रोहापेक्षा कमी नाही. त्यांनी समाजवादी पक्ष आणि काँग्रेसवर संविधानाच्या नावाखाली लोकांची दिशाभूल करण्याचा आणि राष्ट्रगीताचा अनादर करण्याचा आरोप केला. आदित्यनाथ म्हणाले की, राज्याला त्याच्या वारशाचा अभिमान आहे आणि वारशात रुजलेला विकास हा उज्ज्वल भविष्याचा पाया रचतो.

## अजित पवारांच्या निधनानंतर ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा

# त्या निर्णयाला मुख्यमंत्र्याची स्थगिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** अजित पवारांच्या अपघाती निधनादिवशीच मंत्रालयात अत्यंत लाजीरवाणी घटना घडल्याचे समोर आले आहे. अल्पसंख्याक विकास विभागाने ७५ शाळांना परस्परपणे अल्पसंख्यांक दर्जाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. हे प्रकरण समोर येताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेत संबंधित प्रमाणपत्रास स्थगिती देण्यात आली. तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी उच्चस्तरीय अधिकाऱ्याकडून करुन दोषींवर कारवाई करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिल्याची माहिती समोर आली आहे.

२८ जानेवारी रोजी सकाळी ८.४५ वाजता विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याची बातमी समोर आल्यानंतर राज्यात शोककळा पसरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला. मात्र, याच दिवशी आणि त्यानंतरच्या काही दिवसांत राज्याच्या अल्पसंख्याक विकास विभागाकडून तब्बल ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्यात आल्याचा प्रकार उघड झाल्याने राजकीय व प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २८ जानेवारीला दुपारी ३.०९ वाजता अल्पसंख्याक दर्जाबाबतचे पहिले प्रमाणपत्र जारी करण्यात आले. २८, २९, ३० जानेवारी आणि २ फेब्रुवारी या कालावधीत एकूण ७५ शाळांना प्रमाणपत्रे देण्यात आली. विशेष म्हणजे, या खात्याची जबाबदारी अजित पवार यांच्याकडेच होती. त्यांच्या निधनानंतर आणि शासकीय दुखवटा असताना मंत्रालयात ही प्रक्रिया नेमकी कशी आणि कुणाच्या आदेशाने राबवली, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

२८ जानेवारीलाच श्री माता कन्यका सेवा संस्था आणि सेवादास महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, यवतमाळ यांसह एकूण सात संस्थांना अल्पसंख्याक दर्जा देण्यात आला. एकूण ७५ शाळांपैकी २८ शाळा या पोद्दार इंटरनॅशनल स्कूल समूहाच्या असल्याचे समोर आले आहे. या सर्व प्रमाणपत्रांवर अल्पसंख्याक विकास विभागाचे उपसचिव मिलिंद शेनॉय यांची डिजिटल स्वाक्षरी असल्याचे स्पष्ट झाले आहे. यापूर्वी अजित पवार, माणिकराव कोकाटे आणि दत्तात्रय भरणे यांनी या प्रमाणपत्रांना स्थगिती दिली होती. अल्पसंख्याक दर्जा मिळालेल्या शैक्षणिक संस्थांवर काही विशिष्ट कायदे लागू होत नाहीत. अशा शाळांना शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार २५ टक्के वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे बंधन नसते. शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा बंधनकारक नसते. पदोन्नतीत सवलती मिळतात तसेच देणग्या व अनुदान स्वीकारण्यास अधिक मुभा मिळते.

## दादांच्या विमानातील ब्लॅक बॉक्स दोन दिवसांत माहिती येणार समोर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाला पंधरा दिवस होऊन गेले आहेत. अजित पवार यांच्या विमानाला नेमका कोणत्या कारणामुळे अपघात झाला, याचा शोध घेतला जात आहे. या अपघाताचा तपास डीजीसीए आणि एएआयबीकडून सुरु आहे. पण अद्याप तरी अपघाताचं कारण पुढे येऊ शकलेलं नाही. अपघाताच्या तपासात मोठा अडथळा आला आहे. त्यामुळे अपघाताचं कारण समोर येण्यास विलंब लागण्याची शक्यता आहे.

अजित पवार यांच्या विमानाला २८ जानेवारीच्या सकाळी पावणे नऊच्या सुमारास अपघात झाला. त्यावेळी अजित पवार मुंबईहून पुण्याला जात होते. बारामतीच्या धावपट्टीपासून ५० मीटर अंतरावर त्यांचं विमान कोसळलं. भीषण अपघातात विमानातील सर्वांचा मृत्यू झाला. या विमानात अजित पवारांसह एकूण पाच जण होते. अपघातानंतर विमानाला आग लागली. त्यानंतर मोठा स्फोट झाला. अजित पवार व्हिएसआर व्हेंचर्स कंपनीच्या विमानातून प्रवास करत होते. अपघातानंतर विमानाचा ब्लॅक बॉक्स हाती लागला.

ब्लॅक बॉक्समधील डेटा बाहेर काढण्यासाठी तो परदेशात पाठवला जाण्याची दाट शक्यता आहे. याबद्दलचा निर्णय १ ते २ दिवसांत घेतला जाऊ शकतो. तशी माहिती केंद्रीय विमान उड्डाण प्रशासनातील सुत्रांनी दिली आहे. एएआयबीकडून विमान अपघातामागील कारणांचा शोध घेतला जात आहे. गेल्या वर्षी अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाला. लंडनला जाणारं विमान उड्डाणानंतर अवघ्या काही मिनिटांत कोसळलं. या विमानाचा ब्लॅक बॉक्स सुस्थितीत होता. त्यामुळे त्यातील डेटा भारतातच रिकव्हर करण्यात आला.

## महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात

# पुणे-कोल्हापूर तीन तासांत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे आणि कोल्हापूरदरम्यानचा प्रवास लवकरच अधिक जलद आणि सुरक्षित होणार आहे. पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील पुणे-सातारा-कराड-कोल्हापूर या मार्गावरील बहुतांश कामे अंतिम टप्प्यात आली असून जून पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. काम पूर्ण झाल्यानंतर चार ते साडेचार तास लागणारा प्रवास तीन तासांत पूर्ण होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

हा प्रकल्प भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या देखरेखीखाली राबविला जात आहे. चौपदरीकरण आणि सहापदरीकरणासह उड्डाणपूल, भुयारी मार्ग आणि अपघातप्रवण ठिकाणांवरील सुधारणा वेगाने सुरू आहेत. विशेषत: पेठ नाका ते सातारा आणि सातारा ते पुणे या टप्प्यांवर मोठ्या प्रमाणात कामे हाती घेण्यात आली आहेत. खेड शिवापूर, शिवरे, हरिश्चंद्री आणि वेळे परिसरातील धोकादायक वळणांवर सुधारणा करण्यात येत असून वाहतुकीची सुरक्षितता वाढविण्यावर भर दिला जात आहे. खंबाटकी घाटातील नवीन बोगद्याचे काम पूर्ण झाले असून सध्या एकेरी वाहतूक सुरू आहे. पेठ नाका ते कराड या सुमारे २७ किलोमीटर रस्त्याचे काम अदानी रोड इन्फ्रास्ट्रक्चर्सकडून सुरू आहे. कराड येथील उड्डाणपूल जूनपर्यंत खुला करण्याचे नियोजन आहे. तसेच पेठ नाका ते कोल्हापूर या सुमारे ४५ किलोमीटर मार्गाचे काम रोडवेज सोल्युशन इंडिया इन्फ्रा लिमिटेडकडून सुरू आहे.

## आंदोलनाच्या अधिकाराला शिस्तीचा लगाम

# पुणे पोलिसांचा राजकीय पक्षांना दणका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** शहरातील वाढत्या राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापुढे कोणत्याही राजकीय पक्षाला प्रतिस्पर्धी पक्षाच्या कार्यालयावर मोर्चा काढण्यास किंवा आंदोलन करण्यास परवानगी दिली जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

अलीकडेच शहरात काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या वादानंतर वातावरण तणावपूर्ण झाले होते. घोषणाबाजी आणि प्रतिआंदोलनामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांना अतिरिक्त बंदोबस्त तैनात करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तांनी कडक भूमिका घेत शहरात कोणत्याही पक्षाच्या कार्यालयासमोर थेट मोर्चा किंवा आंदोलन करण्यास मनाई केली आहे. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार सर्वांना आहे; मात्र तो शांततेच्या आणि कायद्याच्या चौकटीत असावा, अशी भूमिका पोलिस प्रशासनाने स्पष्ट केली आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था, नागरिकांचे दैनंदिन जीवन आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण लक्षात घेऊन सर्व आंदोलनांसाठी पूर्वपरवानगी बंधनकारक करण्यात आली आहे. प्रशासनाने निश्चित केलेल्या ठिकाणीच निदर्शने घेता येतील. थेट प्रतिस्पर्धी पक्षाच्या कार्यालयावर मोर्चा नेण्यास पूर्ण बंदी राहणार आहे.

या निर्णयावर राजकीय पक्षांकडून संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काहींनी सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी हा निर्णय योग्य असल्याचे म्हटले आहे, तर काहींनी लोकशाही अधिकारांवर मर्यादा आणल्याची टीका केली आहे. प्रशासनाने सर्व पक्षांना समान वागणूक द्यावी आणि निर्णय पारदर्शक असावा, अशी मागणीही विरोधकांकडून करण्यात आली आहे.

शैक्षणिक आणि राजकीयदृष्ट्या सक्रिय मानल्या जाणाऱ्या पुण्यात विविध मुद्द्यांवर आंदोलने होत असतात. अशा वेळी पक्षांच्या कार्यालयांवर थेट मोर्चे गेल्यास संघर्ष किंवा तोडफोड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पोलिसांचा हा निर्णय तात्पुरता तणाव कमी करण्यास उपयुक्त ठरू शकतो; मात्र आंदोलनाचा अधिकार आणि कायदा-सुव्यवस्था यामधील समतोल राखणे हे प्रशासनासमोरचे मोठे आव्हान राहणार आहे.

दरम्यान, शहरात नुकत्याच झालेल्या राजकीय आंदोलनादरम्यान उद्भवलेल्या तणावपूर्ण परिस्थितीबाबत पुणे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी अधिकृत प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी या घटनेला "अत्यंत दुर्दैवी" संबोधत पोलिसांनी वेळेवर मध्यस्थी करून कायदा व सुव्यवस्था राखल्याचे स्पष्ट केले.

आयुक्तांनी सांगितले की, आंदोलनादरम्यान परिस्थिती चिघळून दगडफेक झाल्याने तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. या प्रकरणात दोन्ही पक्षांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून दोषींवर पुढेही कठोर कारवाई होणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

# विवाहपूर्व संबंधांबाबत सावधगिरी आवश्यक

## सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले महत्त्वाचे निरीक्षण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लग्नाआधी मुलगा आणि मुलगी हे "पूर्णपणे परके" असतात, त्यामुळे विवाहपूर्व शारीरिक संबंधांबाबत सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी नोंदवले. लग्नाचे खोटे आश्वासन देऊन बलात्कार केल्याच्या आरोपाखालील व्यक्तीच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना हे मत व्यक्त करण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि उज्जल भुईयां यांच्या खंडपीठासमोर हा मुद्दा आला. तक्रारदार महिलेचा आरोप आहे की, आरोपीने लग्नाचे आश्वासन देत तिच्याशी दिल्ली तसेच दुबई येथे शारीरिक संबंध ठेवले.

सुनावणीदरम्यान खंडपीठाने दुबई प्रवासाच्या पार्श्वभूमीवर काही प्रश्न उपस्थित केले. उपलब्ध नोंदींनुसार संबंध परस्पर संमतीने झालेले दिसत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. "आम्ही कदाचित जुन्या विचारांचे असू, पण लग्नाआधी मुलगा-मुलगी पूर्णपणे परके असतात. अशा नात्यांमध्ये सावधगिरी बाळगली पाहिजे," असे निरीक्षण खंडपीठाने केले. न्यायमूर्ती नागरत्ना यांनी स्पष्ट केले की, नात्यात कितीही जवळीक असली तरी विवाहपूर्व शारीरिक संबंध ठेवताना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. लग्नाआधी कोणावरही आंधळा विश्वास ठेवू नये, असेही त्यांनी म्हटले. महिलेच्या वकिलांनी सांगितले की, दोघांची ओळख २०२२ मध्ये एका मॅट्रिमोनियल वेबसाइटवर झाली होती. त्यानंतर आरोपीने लग्नाचे आश्वासन देत वारंवार शारीरिक संबंध ठेवले. तसेच तिच्या संमतीशिवाय खासगी व्हिडिओ रेकॉर्ड करून ते व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. जानेवारी २०२४ मध्ये आरोपीने पंजाबमध्ये दुसऱ्या महिलेशी विवाह केल्याचे तिला नंतर समजल्याचा दावा महिलेने केला आहे.

खंडपीठाने या प्रकरणात परस्पर संमतीचा मुद्दा महत्त्वाचा असल्याचे अधोरेखित केले. अशा प्रकरणांत थेट खटला चालवण्यापेक्षा तोडगा काढण्याचा पर्याय तपासण्याची गरज असल्याचे नमूद करत न्यायालयाने दोन्ही पक्षांना मध्यस्थीचा पर्याय सुचवला. आरोपीच्या वकिलांना संभाव्य तडजोडीचे पर्याय तपासण्याचे निर्देश देण्यात आले असून, महिलेला नुकसानभरपाई देण्याचाही विचार करण्याचे संकेत देण्यात आले. दोन्ही बाजूंची भूमिका नोंदवण्यासाठी पुढील सुनावणी बुधवारी ठेवण्यात आली आहे.

### बेरोजगारी दर वाढून ५ टक्क्यांवर पोहोचला

**नवी दिल्ली :** देशातील बेरोजगारी दर जानेवारी २०२६ मध्ये किंचित वाढून ५ टक्क्यांवर पोहोचला आहे. डिसेंबर २०२५ मध्ये हा दर ४.८ टक्के होता, अशी माहिती सोमवारी प्रसिद्ध झालेल्या अधिकृत सर्वेक्षणातून समोर आली. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केलेल्या ताज्या नियतकालिक कामगार दल सर्वेक्षण अहवालानुसार, १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील व्यक्तींमध्ये बेरोजगारी दरात ही वाढ नोंदवली गेली. जानेवारी महिन्यात ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत बेरोजगारीत किरकोळ वाढ दिसून आली. अहवालानुसार, कामगार दल सहभाग दर आणि कामगार लोकसंख्या प्रमाण यामध्येही घट झाली आहे.

# पुरंदर विमानतळ भूसंपादनाला वेग

## ६ हजार कोटींच्या कर्जाला मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी रखडलेली भूसंपादन प्रक्रिया अखेर मार्गी लागली असून, बाधित शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य मंत्रिमंडळाने प्रकल्पासाठी ६ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास मंजुरी दिल्याने निधीअभावी थांबलेली प्रक्रिया आता गती घेणार आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांमधील सुमारे ३ हजार एकर जमीन संपादित केली जाणार आहे. या प्रक्रियेत ९६ टक्के शेतकऱ्यांनी यापूर्वीच संमती दर्शवली होती. मात्र तांत्रिक कारणे आणि आचारसंहितेमुळे निधीविषयक निर्णय प्रलंबित होता. आचारसंहिता संपताच सरकारने कर्जाला अधिकृत मंजुरी दिली. प्रकल्पाची अंमलबजावणी आणि आर्थिक नियोजन सुसूत्र करण्यासाठी विशेष हेतू प्राधिकरण (एसपीव्ही) स्थापन करण्यात आले आहे. या प्राधिकरणात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी आणि सिडको या तीन महत्त्वाच्या शासकीय संस्थांचा सहभाग असणार आहे. या संस्थांच्या माध्यमातून विमानतळाच्या विकासासोबतच आर्थिक आणि प्रशासकीय समन्वय साधला जाणार आहे.

यावेळी शेतकऱ्यांना मोबदला देण्याच्या पद्धतीत बदल करण्यात आला आहे. पूर्वी रिंगरोड भूसंपादनावेळी चेकद्वारे रक्कम देण्यात आली होती. मात्र या प्रकल्पात मोबदला थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केला जाणार आहे. यासाठी एका राष्ट्रीयीकृत बँकेसोबत विशेष करार करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी सुहास डुडी यांच्या माहितीनुसार, कर्जाची रक्कम प्रशासनाकडे आल्यानंतर सुमारे महिनाभरात सर्व प्रक्रिया पूर्ण करून मोबदला वितरित केला जाईल. या पद्धतीमुळे पारदर्शकता वाढेल आणि शेतकऱ्यांना अनावश्यक विलंब व प्रशासकीय फेऱ्यांचा त्रास होणार नाही, असा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

## स्थलांतराच्या चर्चेमुळे कलाकारांमध्ये नाराजी

# गुडलक चौकातील कलाकार कट्टा वादाच्या भोवऱ्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** शहराच्या मध्यवर्ती भागातील गुडलक चौक येथे गेल्या काही वर्षांत उभा राहिलेला 'कलाकार कट्टा' सध्या वादाच्या केंद्रस्थानी आला आहे. फुटपाथच्या एका कोपऱ्यात सुरू झालेला हा उपक्रम हटवण्याच्या चर्चेमुळे स्थानिक कलाकारांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. वाहतूक कोंडीचा मुद्दा उपस्थित करत काही नागरिकांनी नगरसेवकांमार्फत महापालिका आयुक्तांकडे कट्टा स्थलांतरित करण्याची मागणी केल्याची माहिती समोर आली आहे.

मात्र कलाकारांचा दावा वेगळा आहे. हा कट्टा रस्त्याच्या मधोमध नसून फुटपाथच्या कोपऱ्यात उभारण्यात आला असून वाहतुकीस अडथळा होणार नाही, याची काळजी घेतली गेली आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. दररोज सुमारे नऊ ते दहा कलाकार येथे चित्रकला, व्यंगचित्र, शिल्पकला आणि विविध सर्जनशील कला सादर करतात. विशेषतः फर्ग्युसन कॉलेज परिसरातील विद्यार्थी येथे येऊन आपली कला लोकांसमोर मांडतात.

कलाकारांच्या मते, हा कट्टा केवळ बसण्याची जागा नसून तरुणांसाठी संधीचे व्यासपीठ आहे. अनेक विद्यार्थ्यांकडे आर्थिक साधनांची कमतरता असली तरी त्यांच्या हातात कला आहे. या माध्यमातून त्यांना थेट नागरिकांशी संवाद साधण्याची आणि काही प्रमाणात आर्थिक आधार मिळवण्याची संधी मिळते. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने पर्यटक, नागरिक आणि विद्यार्थी यांच्यापर्यंत कला पोहोचवण्याचे काम येथे होते.

### कलाकारांना न्याय मिळावा...

- पुणे 'सांस्कृतिक राजधानी' म्हणून ओळखले जाते. अशा शहरात तरुण कलाकारांसाठी निर्माण झालेले खुले व्यासपीठ हटवण्याचा निर्णय घेतल्यास त्याचा परिणाम कलाकारांपुरता मर्यादित राहणार नाही, तर शहराच्या सांस्कृतिक ओळखीवरही परिणाम होऊ शकतो. आता अंतिम निर्णय महापालिकेच्या हातात असून, वाहतूक सुरळीत ठेवत कलाकारांनाही न्याय देणारा तोडगा निघतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या चार दशकांपासून कला क्षेत्रात कार्यरत असलेल्या एका ज्येष्ठ कलाकाराने सांगितले की, १९९८ पासून ते या चौकात बसून चित्रकला सादर करत आहेत. त्या काळात 'कलाकार कट्टा' नव्हता; मात्र सातत्याने बसून त्यांनी लोकांशी संवाद साधला. नागरिकांच्या प्रतिसादामुळेच ही परंपरा टिकून राहिली. कट्टा हटवण्यामागे वाहतूक कोंडीचे कारण पुढे केले जात असले तरी कलाकार त्याला विरोध करीत आहेत. त्यांच्या मते, खंडोजी बाबा चौक, गोखले चौक, डेक्कन जिमखाना परिसर तसेच बीएमसीसी रस्ता येथे अनेक वर्षांपासून वाहतुकीची समस्या आहे. कट्टा सुरू होण्यापूर्वीही येथे कोंडी होत होती. त्यामुळे केवळ स्थलांतर केल्याने प्रश्न सुटेल, याची खात्री नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. कलाकारांनी तक्रारींची वस्तुनिष्ठ तपासणी करण्याची मागणी केली आहे. वाहतुकीचा सविस्तर अभ्यास करून शाश्वत उपाययोजना कराव्यात; मात्र कला दडपण्याचा मार्ग स्वीकारू नये, अशी त्यांची भूमिका आहे.

# कर्नाटकात पुन्हा अस्वस्थता

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बेंगळुरू :** कर्नाटक काँग्रेसमधील मुख्यमंत्रीपदाचा वाद आता उघडपणे समोर आला असून राजकारणात मोठ्या घडामोडींची शक्यता व्यक्त होत आहे. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांना मुख्यमंत्री करण्यासाठी काँग्रेसमधील काही आमदारांनी भूमिका घेतली आहे. "शिवकुमार यांना मुख्यमंत्री होण्यापासून आता कोणीही रोखू शकत नाही," असा दावा काही आमदारांनी केला आहे.

काँग्रेस आमदार रविकुमार गौडा गणिगा यांनी दावा केला की पक्षाचे सर्व १३६ आमदार डी.के. शिवकुमार यांच्या पाठीशी उभे आहेत. "शिवकुमार गेली ४० वर्षे सक्रिय राजकारणात आहेत. त्यांच्याकडे संघटन कौशल्य आणि राजकीय रणनीती आहे. ते शांतपणे आपली भूमिका मांडत आहेत आणि योग्य वेळी निर्णय होईल," असे त्यांनी म्हटले. तसेच भाजपमध्ये जाण्याचा प्रश्नच नाही, शिवकुमार काँग्रेसमधूनच मुख्यमंत्री होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दुसरीकडे आमदार इक्बाल हुसेन यांनी सांगितले की किमान ८० ते ९० आमदारांनी पक्षश्रेष्ठींना डी.के. शिवकुमार यांना मुख्यमंत्रीपदाची संधी देण्याची लेखी विनंती केली आहे. ही मागणी अशा वेळी पुढे आली आहे, जेव्हा शिवकुमार यांनी अलीकडेच नवी दिल्लीत १० जनपथ येथे पक्षश्रेष्ठींची भेट घेतली. माध्यमांशी बोलताना त्यांनी चर्चेचा तपशील देण्याचे टाळले, मात्र राजकीय चर्चा झाल्याचे मान्य केले.

## संपादकीय

### पंतप्रधान मोदी संवाद की स्वसंवाद?



**एका वृत्तसंस्थेला दिलेल्या विशेष मुलाखतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकारच्या कामगिरीचा आढावा घेत विकसित भारताची दिशा स्पष्ट केली. आत्मविश्वासपूर्ण मांडणी, सुधारणा आणि जागतिक स्थान यांचे चित्र उभे राहिले; मात्र अनुत्तरित प्रश्नांची सावलीही तितकीच प्रकर्षाने जाणवली.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेली ही मुलाखत आशयाच्या दृष्टीने व्यापक आणि राजकीय अर्थाने सूचक ठरते. संवादाचा सूर आत्मविश्वासाचा आहे. सरकारने गेल्या दशकात केलेल्या सुधारणा, पायाभूत सुविधांतील गुंतवणूक, तंत्रज्ञानाधिष्ठित प्रशासन आणि जागतिक पटलावरील भारताचे उंचावलेले स्थान यांचा त्यांनी परिपाठ मांडला. सार्वजनिक जीवनात संपूर्ण समाधान मान्य नसते; सतत अधिक चांगले करण्याची अस्वस्थता हवी, असे ते म्हणाले. ही भूमिका नेतृत्वाच्या कार्यतत्परतेची साक्ष देणारी असली तरी तिची परिणामकारकता प्रत्यक्ष आकडेवारीतूनच तपासली जाईल. अर्थकारणाच्या संदर्भात त्यांनी अलीकडील अर्थसंकल्पाला दीर्घकालीन ध्येयाशी जोडले. अल्पकालीन लोकप्रियतेपेक्षा संरचनात्मक बदलांना प्राधान्य दिल्याचा दावा त्यांनी केला. उत्पादनवाढ, पायाभूत सुविधा, डिजिटल व्यवहार आणि थेट लाभ हस्तांतरण या उपक्रमांचा उल्लेख करून प्रशासनातील गती अधोरेखित केली. परंतु वाढीचे दर, रोजगारनिर्मितीची गुणवत्ता आणि ग्रामीण मागणीतील चढउतार यांसारखे प्रश्न अजूनही समोर आहेत. वाढीचा आलेख वर जात असताना विषमता कमी होत आहे का, हा मुद्दा तितकाच महत्त्वाचा ठरतो. जागतिक संदर्भात भारताने बहुपक्षीय करार आणि द्विपक्षीय व्यापारचर्चांत सक्रिय भूमिका घेतल्याचे त्यांनी नमूद केले. पूर्वी अडखळलेल्या चर्चा आता मार्गी लागत असल्याचा संदेश त्यांनी दिला. यामागे आत्मनिर्भरतेचा आग्रह आणि जागतिक स्पर्धात्मकतेचा समन्वय साधण्याची भूमिका आहे. तथापि, व्यापारवाढीचे लाभ लघु आणि मध्यम उद्योगांपर्यंत कितपत पोहोचतात, याचे मूल्यमापन अद्याप आवश्यक आहे. करारांची घोषणात्मक बाजू वेगळी आणि अंमलबजावणीतील अडथळे वेगळे असतात. राजकीय परिप्रेक्ष्यात त्यांनी विरोधकांवर टीका करत पूर्वीच्या काळातील धोरणात्मक संकोचाचा उल्लेख केला. ही तुलना राजकीयदृष्ट्या उपयुक्त असली तरी लोकशाहीत प्रश्न विचारण्याचा अधिकार नाकारता येत नाही. मुलाखतीतील अनेक उत्तरे विस्तृत होती; परंतु काही मुद्द्यांवर अधिक तपशील अपेक्षित राहिला. उदाहरणार्थ, बेरोजगारीची अधिकृत आकडेवारी आणि कौशल्यविकास कार्यक्रमांच्या परिणामांचे ठोस मोजमाप याविषयी स्पष्ट भाष्य कमी भासते. नेतृत्वाच्या शैलीविषयी बोलताना त्यांनी 'सतत जागरूकता' हा गुणधर्म अधोरेखित केला. प्रशासकीय निर्णयप्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर, भ्रष्टाचाराविरोधी उपाय आणि थेट लाभ योजनांमुळे पारदर्शकता वाढल्याचा दावा त्यांनी केला. या दाव्यांमध्ये काही प्रमाणात वस्तुस्थिती आहे. डिजिटल व्यवहारांच्या वाढीने मध्यस्थांची संख्या कमी झाली आहे. तरीही प्रशासकीय यंत्रणेतील तळागाळातील अनुभव एकसमान नाहीत. केंद्र आणि राज्यांच्या कार्यक्षमतेतील फरक नागरिकाला जाणवतो. विकसित राष्ट्राचा ध्यास हा त्यांच्या मांडणीचा मध्यबिंदू आहे. आर्थिक वृद्धी, सामाजिक समावेशकता आणि जागतिक प्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर त्यांनी भर दिला. परंतु विकसिततेचा अर्थ केवळ जीडीपीचा आकार नाही; तो शिक्षणाची गुणवत्ता, सार्वजनिक आरोग्याची उपलब्धता, न्यायव्यवस्थेची गती आणि संस्थात्मक स्वायत्तता यांमध्येही प्रतिबिंबित व्हायला हवा. या क्षेत्रांतील सुधारणांची गती विषम आहे. मुलाखतीचा एक राजकीय पैलूही दुर्लक्षिता येत नाही. राष्ट्रीय वृत्तसंस्थेला दिलेला संवाद हा संदेशवहनाचा प्रभावी मार्ग असतो. यातून सरकार आपली बाजू सुसंगतरीत्या मांडते. परंतु संवादाचा खरा अर्थ तेव्हाच पूर्ण होतो, जेव्हा अस्वस्थ करणारे प्रश्नही तितक्याच प्रांजळपणे विचारले जातात आणि उत्तरेही तितकीच स्पष्ट मिळतात. लोकशाहीत संवाद एकतर्फी नसतो; तो प्रश्नोत्तरांच्या परस्परविश्वासावर आधारलेला असतो. एकूणात ही मुलाखत आत्मविश्वासपूर्ण शासनकथन मांडते. देशाने काही क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे, हे नाकारता येत नाही. परंतु प्रगतीचा वेग आणि तिचा सामाजिक विस्तार यांचे परीक्षण अपरिहार्य आहे. विकासाच्या दाव्यांइतकीच जबाबदारीही ठळक असावी लागते. नेतृत्वाची खरी कसोटी घोषणा नव्हे, तर परिणामांची सातत्यपूर्ण सिद्धता आहे. संवाद स्वसंवादात परिवर्तित होऊ नये, याची दक्षता माध्यमे आणि सत्ताधारी दोघांनी घ्यावी लागेल. विकसित भारताच्या दिशेने प्रवास करताना पारदर्शकता, समावेशकता आणि उत्तरदायित्व ही तीन तत्त्वे समान महत्त्वाची ठरतील.

# मतदारयादी आणि लोकशाहीची कसोटी

**» पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीच्या तोंडावर सात अधिकाऱ्यांचे निलंबन हा केवळ प्रशासकीय निर्णय नाही; तो मतदारयादीच्या अचूकतेवर आणि निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर उभा राहिलेला प्रश्न आहे. लोकशाहीची पायाभूत कडी ढासळू नये, यासाठी आयोगाची ही कठोर सूचना मानावी लागेल.**




पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीच्या उंबरठ्यावर सात अधिकाऱ्यांचे निलंबन हा केवळ प्रशासकीय निर्णय नाही; तो लोकशाही प्रक्रियेच्या विश्वासार्हतेविषयीचा इशारा आहे. मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्तीशी संबंधित कर्तव्यात गंभीर त्रुटी आढळल्याचे नमूद करत निवडणूक आयोगाने ही कारवाई केली. लोकप्रतिनिधी कायदा, १९५० मधील कलम १३सीसीचा आधार घेत आयोगाने आपल्या अधिकारांचा वापर केला आणि राज्याच्या मुख्य सचिवांना शिस्तभंगाची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले.

मतदार यादी ही लोकशाहीची पायाभूत कडी आहे. निवडणुकीतील प्रत्येक मताचे मूल्य हे त्या यादीच्या अचूकतेवर अवलंबून असते. मतदारांची नावे वगळली जाणे, काल्पनिक नोंदी राहणे किंवा पुनरावृत्तीतील त्रुटी या केवळ तांत्रिक बाबी नसतात; त्या मतदानाच्या हक्कावर परिणाम करणाऱ्या असतात. त्यामुळेच निवडणूक आयोगाने 'गंभीर निष्काळजीपणा' हा शब्दप्रयोग वापरला, तो अनायासे नाही.

विशेष सघन पुनरावृत्ती ही प्रक्रिया स्वभावतः संवेदनशील असते. स्थलांतर, मृत्यू, वयाची अट पूर्ण होणे अशा अनेक घटकांमुळे मतदारयादीत बदल घडत असतात. अशा वेळी अचूक पडताळणी, स्थानिक पातळीवरील जबाबदारी आणि राजकीय दबावापासून स्वायत्तता ही त्रिसूत्री महत्त्वाची ठरते.

पश्चिम बंगालमध्ये ज्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली, त्यात विविध मतदारसंघांतील सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी आणि स्थानिक प्रशासनातील पदाधिकारी यांचा समावेश आहे. ही यादी सूचित करते की त्रुटी एक-दोन व्यक्तींमध्ये मर्यादित नव्हत्या; ती पद्धतशीर बेफिकिरीची शक्यता दर्शवते.

निवडणूक आयोगाने स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की अशा गैरप्रकारांमुळे निवडणूक प्रक्रियेची अखंडता धोक्यात येते आणि ते खपवून घेतले जाणार नाहीत. हा संदेश केवळ संबंधित अधिकाऱ्यांसाठी नाही; तो सर्व राज्यांतील निवडणूक यंत्रणेसाठी आहे. निवडणुकीच्या आधी प्रशासनातील प्रत्येक स्तरावर दक्षता वाढवण्याचा हा प्रयत्न मानावा लागेल.

या कारवाईचा राजकीय संदर्भही लक्षात घ्यावा लागतो. पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी पक्ष आणि केंद्र यांच्यातील तणाव सर्वश्रुत आहे. अशा परिस्थितीत आयोगाची कोणतीही कारवाई राजकीय चष्म्यातून पाहिली जाण्याची शक्यता असते. म्हणूनच आयोगाने कायद्याचा स्पष्ट आधार देत निर्णय जाहीर केला, ही बाब महत्त्वाची ठरते.

लोकप्रतिनिधी कायद्यातील तरतुदींचा वापर करून निलंबनाचा आदेश देणे म्हणजे केवळ प्रशासकीय सूचनांवर न थांबता कायदेशीर अधिकाराची अंमलबजावणी करणे. तथापि, प्रश्न असा आहे की अशा त्रुटी आधीच कशा घडल्या? मतदारयादीतील चुका निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वीच लक्षात येणे ही यंत्रणेतील कमकुवत दुव्याची खूण आहे.

डिजिटल तंत्रज्ञान, आधार-आधारित पडताळणी, घराघरातील सर्वेक्षण यांसारखी साधने उपलब्ध असताना अचूकतेत त्रुटी राहणे स्वीकारार्ह ठरत नाही. निवडणूक व्यवस्थेने तांत्रिक साधनांचा वापर वाढवला असला, तरी स्थानिक पातळीवरील मानवी घटक अद्याप निर्णायक ठरतो.

निलंबन ही प्रारंभीची कारवाई आहे. पुढील शिस्तभंग प्रक्रियेत दोष निश्चित करणे, जबाबदारी ठरवणे आणि भविष्यातील सुधारणा सुचवणे ही अपेक्षित पावले आहेत. जर निष्काळजीपणा सिद्ध झाला, तर कठोर शिक्षा ही लोकशाहीवरील विश्वास टिकवण्यासाठी आवश्यक ठरेल. परंतु जर त्रुटी प्रणालीगत असतील, तर केवळ व्यक्तींना दोषी ठरवून प्रश्न सुटणार नाही. प्रशिक्षण, निरीक्षण आणि पारदर्शकतेच्या प्रक्रियेत बदल करावे लागतील.

या घटनेतून व्यापक धडा असा की निवडणूक ही केवळ मतदानाचा दिवस नसतो; ती दीर्घकालीन प्रशासकीय तयारीचा परिणाम असते. मतदारयादीतील प्रत्येक नाव हा नागरिकत्वाच्या हक्काचा पुरावा असतो. त्यातली चूक म्हणजे त्या हक्कावर प्रश्नचिन्ह. त्यामुळे आयोगाची कठोर भूमिका स्वागतार्ह असली, तरी तिची सातत्यपूर्ण अंमलबजावणी अधिक महत्त्वाची आहे.

लोकशाहीची खरी कसोटी मतदानाच्या टक्केवारीत नसते; ती प्रक्रियेच्या विश्वसनीयतेत असते. पश्चिम बंगालमधील ही कारवाई त्या विश्वसनीयतेची आठवण करून देते. निवडणूक आयोगाने दाखवलेली तत्परता ही योग्य दिशेने उचललेले पाऊल आहे. आता पुढील जबाबदारी राज्य प्रशासन आणि निवडणूक यंत्रणेवर आहे. चुका सुधारण्याची आणि मतदारांच्या विश्वासाला धक्का बसू न देण्याची.

निवडणुका जितक्या स्पर्धात्मक, तितकी प्रशासनाची जबाबदारी अधिक. मतदारयादी शुद्ध, अचूक आणि निष्पक्ष राहिली तरच निकालाबद्दलचा विश्वास दृढ राहील. अन्यथा शंकेची सावली मतपेटीपर्यंत पोहोचायला वेळ लागत नाही. लोकशाहीत विश्वास हरवणे सोपे; परत मिळवणे कठीण. आयोगाच्या या कारवाईने किमान इतके तरी स्पष्ट केले आहे की त्या विश्वासाच्या रक्षणासाठी तो सज्ज आहे.

या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांना अधिक बळ देणे अपरिहार्य ठरते. मतदारयादीतील प्रत्येक दुरुस्तीची नोंद, तिची कारणमीमांसा आणि सार्वजनिक पडताळणी यांची प्रभावी अंमलबजावणी झाली तरच शंका कमी होतील. अन्यथा प्रशासकीय कारवाई असूनही अविश्वासाचे ढग कायम राहतील.

# पिंपरीत भाजपचे सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना केल्याच्या निषेधार्थ पिंपरी-चिंचवड शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने पिंपरी चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. अस्मितेला धक्का देणारे वक्तव्य केल्याचा आरोप करत कार्यकर्त्यांनी सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारून संताप व्यक्त केला आणि हकालपट्टीची मागणी केली.

शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात आ. उमा खापरे, जिल्हा सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, सरचिटणीस वैशाली खाडये, माजी नगरसेवक राजू दुर्गे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव आणि मंडलाध्यक्ष मंगेश धाडगे यांनी सपकाळाचा निषेध केला.

वक्त्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून त्यांच्या कार्याची तुलना कोणाशीही करणे अयोग्य आहे. इतिहासाचा विपर्यास करून जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. संबंधितांनी तात्काळ माफी मागावी आणि त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अन्यथा लोकशाही मार्गाने अधिक तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा देण्यात आला. यावेळी हरीश मोरे, युवराज लांडे, देविदास साबळे, कैलास सानप, खंडूदेव काठारे, सतीश नागरगोजे, दीपक नागरगोजे, गणेश ढाकणे, देवदत्त लांडे, डॉ. हेमंत देवकुळे आणि हेमचंद्र मासुळकर यांचीही भाषणे झाली.

आंदोलनात आमदार उमाताई खापरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे, दक्षिण भारत आघाडीचे प्रदेश संयोजक राजेश पिल्ले, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, जिल्हा सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, वैशाली खाडये, मधुकर बच्चे, नगरसेवक अनुराधा गोरखे, विजय उर्फ शीतल शिंदे, सागर गवळी, राजू मिसाळ, डॉ. सुहास कांबळे, कोषाध्यक्ष राजाभाऊ मासुळकर, प्रवक्ते कुणाल लांडगे, मोहन राऊत, अनिता वाळूंजकर, अजित कुलथे, विजय शिनकर, मनोज ब्राह्मणकर, गणेश ढाकणे, देवदत्त लांडे, खंडू काठारे, कैलास सानप, मनीष पंजाबी, युवराज लांडे, सतपाल गोयल, देविदास साबळे, नंदू कदम, दीपक नागरगोजे, युवराज ढोरे, सतीश नागरगोजे, बिभीषण चौधरी, नेताजी शिंदे, हरीश मोरे, दिलीप गडदे, शिवदास हांडे, संतोष टोणगे, हेमंत देवकुळे, सचिन उदागे, रवींद्र सानप, रोहित मोखा, सुमित घाटे, राहुल खाडे, साची दोशी, प्रतीक रामगुडे, साईराज भालेकर, ऋषी भालेकर, गोपाल मंडल, दिनेश काटे, मनोज घोडेकर, अभिजित बागुल, आदम मुलाणी, अजय मोरे, उमेश सांडभोर, गौरव शिरुडे, प्रद्योतसिंग हंस, वैभव लंभाते, वरद अंबिके, सुधीर साळुंखे, मयूर काळभोर, जालिंदर काटे, विजय दळवी, ओमकार पवार, निखिल सहाने, संजय परळीकर यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. "सपकाळ यांना पदावरून बडतर्फ करा" अशा घोषणांनी पिंपरी चौक परिसर दणाणून गेला होता.

# पिंपरी-चिंचवडमध्ये सात नवी स्वस्त धान्य दुकाने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात सात नवी स्वस्त धान्य दुकाने सुरू करण्यात आली असून फेब्रुवारी महिन्यापासून या दुकानांमधून लाभार्थ्यांना प्रत्यक्ष धान्यवाटप सुरू झाले आहे. अन्न पुरवठा विभागाने यासंदर्भातील सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केली असून संबंधित शिधापत्रिकाधारकांना या नव्या दुकानांशी जोडण्यात आले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील महत्त्वाचा दुवा म्हणून या सातही दुकानांचा कारभार महिला बचत गटांकडे सोपविण्यात आला आहे. सध्या शहरातील २८ स्वस्त धान्य दुकाने महिला बचत गटांमार्फत चालविली जात असून त्यामध्ये आता सात दुकानांची भर पडली आहे. महिला सक्षमीकरणाला चालना देतानाच धान्यवाटप प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि जबाबदारी येईल, अशी अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे. नवीन दुकानांमुळे लाभार्थ्यांना घराजवळच धान्य उपलब्ध होणार असून पूर्वीप्रमाणे लांब अंतरावर जावे लागणार नाही. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग लाभार्थ्यांची गैरसोय टळणार आहे.

या दुकानांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक यंत्रणा आणि यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. संबंधित यंत्रांवर धान्यवाटपाची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून नागरिकांनी नियमानुसार धान्य घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# उपनगरांत पाणीटंचाईची तीव्रता वाढली

## उन्हाळ्याचा चटका वाढू लागल्याने टँकरवर अवलंबित्व वाढले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** उन्हाळ्याचा चटका वाढू लागल्याने पिंपरी-चिंचवडमधील काळेवाडी, थेरगाव, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, जुनी सांगवी आदी भागांत पाणीटंचाईचे संकट तीव्र झाले आहे. अनेक ठिकाणी कमी दाबाने व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना रोजच्या वापरासाठी खासगी टँकर मागवावे लागत असून पिण्यासाठी बाटलीबंद पाणी विकत घ्यावे लागत आहे. या परिस्थितीमागे आर्थिक हितसंबंध आणि टँकरमधील संगनमत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

काळेवाडी परिसरातील अनेक सोसायट्या आणि नागरी वस्त्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून अत्यंत कमी दाबाने पाणी येत आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळेत पाणीपुरवठा अपुरा होत असल्याची तक्रार रहिवाशांनी केली. त्यामुळे जलवाहिनीतील गळती, तांत्रिक बिघाड किंवा वितरण व्यवस्थेतील असमतोल यापैकी नेमके कारण काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दुपारी दोन ते पाच या वेळेत खासगी टँकरची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होताना दिसून येते. दिवसाला सरासरी वीस टँकर पाणीपुरवठा केला जात असून टँकरसाठी सातशे ते बाराशे रुपये मोजावे लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

ज्योतिबानगर, भारत माता चौक परिसर, तापकीर मळा, नखाते वस्ती, पवनानगर, बीआरटी नवीन रस्त्याकडील भाग, रहाटणीतील अंतर्गत वस्ती, विजयनगर, आदर्शनगर, किनारा कॉलनी, संत निरंकारी मंडळ परिसर, सत्संग रस्ता आणि अल्फान्सो शाळेजवळील भागात पाणीपुरवठा कमी दाबाने होत असल्याची नोंद आहे. जुनी सांगवी परिसरातही पाणीपुरवठा विस्कळित झाला आहे. सांगवी, ममतानगर, लक्ष्मीनगर, अभिनवनगर, मधुबन, सांगवी गावठाण, जयमालानगर आदी भागांत दिवसाआड व कमी दाबाने पाणी येत आहे. अनेक ठिकाणी रात्री उशिरा पाणी येत असल्याने टाक्या पूर्ण भरत नसल्याची तक्रार आहे. परिणामी नागरिकांना टँकर किंवा कॅनमधून पाणी विकत घ्यावे लागत आहे.महापालिकेकडून जलवाहिनी दुरुस्ती, गळती रोखणे व देखभाल कामे सुरू असल्याचे सांगितले जात आहे. "दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत होईल," असे आश्वासन देण्यात आले असले तरी परिस्थिती पूर्ववत होण्यास विलंब होत असल्याची नागरिकांची भावना आहे.

पाणीपुरवठा विभागाचे अभियंता साकेत पावरा यांनी मुख्य जलवाहिनीवरील दुरुस्ती कामांमुळे अनियमितता निर्माण झाल्याचे स्पष्ट केले. "सध्या पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू आहे," असे त्यांनी सांगितले.

## कमाल आणि किमान तापमानात सकाळपासूनच होतेय वाढ

# उन्हाळ्याची चाहूल; शहरात पाण्याची मागणी वाढली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** गेल्या काही दिवसांपासून शहर परिसरात किमान आणि कमाल तापमानात वाढ झाली असून सकाळपासूनच उन्हाची तीव्रता जाणवत आहे. वाढत्या उष्णतेमुळे पाण्याची मागणी वाढली असून काही गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये टँकरच्या फेऱ्यांमध्ये वाढ झाली आहे. जलशुद्धीकरण केंद्रांपासून लांब आणि उंचावरील भागांत कमी दाबाने व अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना ड्रम आणि टाक्यांद्वारे पाणी साठवावे लागत आहे.

सर्व भागांना समप्रमाणात आणि पुरेशा दाबाने पाणी मिळावे, यासाठी महापालिकेकडून दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. निगडी प्राधिकरण सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रातून निगडी, आकुर्डी, पिंपरी, चिंचवड, कासारवाडी, दापोडी, सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, रहाटणी, काळेवाडी, थेरगाव, वाकड, पिंपळे निलख, रावेत, ताथवडे, पुनावळे, किवळे, मामुर्डी, प्राधिकरण परिसर आदी भागांना पाणीपुरवठा केला जातो. तर चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून मोशी, चऱ्होली, दिघी, बोपखेल, प्राधिकरण सेक्टर एक ते तेरा, संतनगर, इंद्रायणीनगर या भागांत पाणी दिले जाते.

या पुरवठ्यासाठी पवना नदीवरील रावेत बंधारा आणि इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यातून अशुद्ध जलउपसा केला जातो. त्यासाठी पवना व आंद्रा धरणांतून नदीपात्रात विसर्ग केला जात आहे. शहरासोबतच नदीकाठच्या गावांनाही तसेच नदीलगतच्या शेतीसाठीही या पाण्याचा वापर केला जात आहे. वाढत्या तापमानामुळे नदीपात्रातील बाष्पीभवन वाढले असून बंधाऱ्यांतील पाणीपातळी अनेकदा खालावत आहे. परिणामी, मागणी आणि उपलब्धता यामध्ये ताण निर्माण होत आहे.

पाणीटंचाईच्या काळात काही गृहनिर्माण सोसायट्यांना बांधकाम व्यावसायिकांकडून स्वखर्चाने पाणीपुरवठा केला जात आहे. बांधकाम परवाना देताना घेतलेल्या हमीपत्रानुसार ही जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. मात्र काही ठिकाणी या अटींचे पालन होत नसल्याची तक्रार असून नागरिकांनी संबंधितांविरुद्ध तक्रार करावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

सद्यःस्थितीत दैनंदिन पाणीपुरवठा पवना धरणातून ५१० दशलक्ष लिटर, आंद्रा धरणातून १०० दशलक्ष लिटर आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून ३० दशलक्ष लिटर असा एकूण ६४० दशलक्ष लिटर होत आहे. धरणांतील पाणीसाठा यंदा गेल्या वर्षाच्या तुलनेत अधिक असला, तरी पुढील चार महिने उन्हाळ्याचे असल्याने पाणी जपून वापरण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

महापालिकेने नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन केले आहे. लोकसंख्येच्या तुलनेत पाणीसाठा मर्यादित असल्याने पिण्याचे पाणी वाहने धुण्यासाठी वापरू नये, नळ सुरू ठेवून भांडी किंवा कपडे धुवू नयेत तसेच दररोज दहा ते पंधरा टक्के पाणी वाचवण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शहरात लोकसंख्या आणि इमारतींची संख्या वाढत असली, तरी पाणीस्रोत वाढत नाहीत. दिवसाआड पाणी मिळत असल्याने ते साठवून ठेवावे आणि नळाला पाणी आले की आधीचे पाणी फेकून देऊ नये, असे महापालिकेचे कार्यकारी अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये कामगार न्यायालयाची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** औद्योगिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात स्वतंत्र कामगार न्यायालय सुरू करण्याची मागणी वेग धरू लागली आहे. तीस लाखांहून अधिक लोकसंख्या आणि हजारो लघू-मध्यम तसेच मोठे उद्योग असलेल्या या शहरातील लाखो कामगारांना सेवासंबंधी वाद, वेतनप्रश्न, कामावरून कमी करणे, शिस्तभंग कारवाई आदी प्रकरणांसाठी पुणे येथील कामगार न्यायालयात जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रमांचा मोठा अपव्यय होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

वाहननिर्मिती, यंत्रसामग्री, विद्युत उपकरणे, अन्नप्रक्रिया, रसायन उद्योग अशा विविध क्षेत्रांत शहराचा औद्योगिक पट्टा विस्तारलेला आहे. चाकण, भोसरी, पिंपरी, चिंचवड, तळेगाव, ताथवडे आदी भागांतून मोठ्या प्रमाणावर औद्योगिक व्यवहार चालतात. कामगार आणि व्यवस्थापन यांच्यात उद्भवणारे वाद वेळेत निकाली निघाले नाहीत, तर त्याचा परिणाम औद्योगिक वातावरणावर होत असल्याचे मत आहे. स्थानिक पातळीवर न्यायालय उपलब्ध झाल्यास वादांचे तातडीने निवारण होऊन औद्योगिक शांतता आणि उत्पादनक्षमता टिकून राहील, असे सांगितले जाते.

कामगार न्यायालयात पिंपरी-चिंचवडमधील शेकडो प्रकरणे प्रलंबित आहेत. सुनावण्यांसाठी वारंवार पुण्याला जावे लागत असल्याने आर्थिक फटका बसतो. प्रवास खर्च, रजा आणि मजुरीतील तोटा यामुळे न्याय मिळवण्याची प्रक्रिया अधिक किचकट बनते. उद्योगांनाही अतिरिक्त संसाधने खर्च करावी लागत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### भिगवणमध्ये मध्यरात्री कार पेटली

**भिगवण :** पुणे-सोलापूर महामार्गावर भिगवण येथील 'बिल्ट' कंपनीच्या मटेरियल गेटजवळ मध्यरात्री एका धावत्या वोल्वो कारने अचानक पेट घेतला. रात्री साधारण एक वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. प्राथमिक अंदाजानुसार, तांत्रिक बिघाडामुळे ही आग लागल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. रात्री एकच्या सुमारास कार मटेरियल गेटजवळून जात असताना इंजिनमधून धूर निघू लागला आणि काही क्षणातच कारने पेट घेतला.

### दरड कोसळून भाविकाचा मृत्यू

**जुन्नर :** हरिश्चंद्रगडावर महाशिवरात्रीचा उत्सव सुरू असतानाच दुर्दैवी घटना घडली. केदारेश्वराचे दर्शन घेऊन परतणाऱ्या एका तरुण भाविकाचा अंगावर दगड कोसळून मृत्यू झाला. घोडेगाव येथील सुरेश डामसे (३५) असे या मृत भाविकाचे नाव असून, या घटनेमुळे ट्रेकर्स आणि भाविकांमध्ये मोठी हळहळ व्यक्त होत आहे. सुरेश डामसे हे दर्शनासाठी गेले होते. सकाळी मंदिरात दर्शन घेऊन त्यांनी परतीचा प्रवास सुरू केला. जुन्नर दरवाजाच्या वाटेने खाली उतरत असताना डोंगराचा एक मोठा भाग निखळला. हा दगड थेट सुरेश यांच्या डोक्यावर आदळला. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

### होमगार्ड जवानाला बारामतीत मारहाण

**बारामती :** येथे महाशिवरात्री यात्रेदरम्यान वर्दीधारी होमगार्ड जवानावर झालेल्या मारहाणीच्या घटनेने संताप व्यक्त होत आहे. शासकीय कर्तव्य बजावत असताना सार्वजनिक ठिकाणी कर्मचाऱ्यावर हात उगारला जाणे ही गंभीर बाब असून, कायदा-सुव्यवस्थेला थेट आव्हान असल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून उमटत आहे.

### महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी हजारोंची उपस्थिती

# राजा हरिश्चंद्रगडावर भाविकांची गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** पुणे, अहिल्यानगर आणि ठाणे जिल्ह्यांच्या सरहद्दीवर वसलेल्या ऐतिहासिक हरिश्चंद्रगड येथे महाशिवरात्रीनिमित्त हजारो भाविकांनी शिवलिंगाचे दर्शन घेतले. रविवारी दि. १५ फेब्रुवारी रोजी गडावर तसेच पायथ्याशी असलेल्या खिरेश्वर गावात दिवसभर धार्मिक वातावरण अनुभवायला मिळाले.

गडाच्या पायथ्याशी जुन्नर तालुक्यातील खिरेश्वर येथे पुरातन नागेश्वर मंदिरात दरवर्षीप्रमाणे यात्रा भरली होती. महाशिवरात्रीच्या निमित्ताने सोमवार दि. ९ ते सोमवार दि. १६ फेब्रुवारीदरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते. शनिवारी दि. १४ रोजी रात्री १०.३० ते पहाटे ४.३० वाजेपर्यंत श्री दुरंतदेव प्रासादिक भजन-भारूड मंडळ व वाघेश्वर कला नाट्य मंडळ, राजगुरूनगर यांच्या भारूडाचा कार्यक्रम रंगला. रविवारी दुपारी ३ ते ५ या वेळेत कुस्त्यांचा जंगी आखाडा भरविण्यात आला.

महाशिवरात्रीच्या आदल्या दिवशीच जुन्नर, नारायणगाव, ओतूर, आळेफाटा, राजुरी, बेल्हे, आणे, अकोले, ब्राम्हणवाडा, केळी, कोतुळ, मढ, सितेवाडी, कोपरे, मुथाळणे, मांडवे, खिरेश्वर, जांभुळशी, खुबी, सावरणे, मुरबाड, टोकावडे आदी परिसरांतील भाविक गडावर मुक्कामी दाखल झाले होते. रात्रीची थंडी लक्षात घेऊन ठिकठिकाणी शेकोट्या पेटविण्यात आल्या. मंदिरात रात्रभर भजनाचा सुश्राव्य कार्यक्रम पार पडला.

महाशिवरात्री निमित्त गडावर आलेल्या भाविकांसाठी छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठान डिंगोरे, अमरनाथ सेवा मंडळ जुन्नर बनकरफाटा, स्वामी समर्थ मित्रमंडळ ओतूर-धोलवड आदी सेवाभावी संस्थांनी पायथ्याशी मोफत फराळाचे स्टॉल उभारले होते. भाविकांना खिचडी, केळी, चहा, लस्सी, पाण्याच्या बाटल्या आणि राजगिरा चिक्कीचे वाटप करण्यात आले.

खिरेश्वर गावात ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी, होमगार्ड आणि हरिश्चंद्र प्रतिष्ठानचे स्वयंसेवक भाविकांच्या सेवेसाठी कार्यरत होते. ठाणे, पुणे आणि नगर जिल्ह्यांच्या सीमेवर माळशेज घाटाच्या डाव्या बाजूस उभा असलेला हरिश्चंद्रगड हा इतिहास, भूगोल आणि पौराणिक संदर्भांनी समृद्ध असा दुर्ग आहे. साडेतीन हजार वर्षांहूनही प्राचीन मानल्या जाणाऱ्या या गडाचा उल्लेख अग्नीपुराण आणि मत्स्यपुराणात आढळतो. नैसर्गिक कडेकपारींनी संरक्षित असलेला हा गड महाशिवरात्रीच्या दिवशी श्रद्धा, परंपरा आणि इतिहासाचा संगम अनुभवत होता.

# धोलवड येथे बिबट्याचे तीन बछडे आढळले



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील धोलवड गावात ऊसाच्या शेतात बिबट्याचे तीन बछडे आढळून आल्याची घटना सोमवारी सकाळी दहाच्या सुमारास घडली. शिवनेरी विद्यालयाजवळील मारुती कसार यांच्या शेतात ही पिल्ले दिसून आल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते.

घटनेची माहिती मिळताच ओतूर वनपरिक्षेत्र कार्यालयाचे कर्मचारी सारिका बुट्टे आणि विश्वनाथ बेले यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तीनही बछड्यांना सुरक्षित ताब्यात घेतले. शेतात काम करणाऱ्या नागरिकांनीही सतर्कता बाळगत वनविभागाला सहकार्य केले.

वनविभागाच्या प्राथमिक माहितीनुसार बछड्यांची आई परिसरातच असल्याची शक्यता आहे. सायंकाळच्या सुमारास आई आणि बछड्यांची पुनर्भेट घडवून आणण्यासाठी त्यांना नैसर्गिक अधिवासात सोडण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

दरम्यान, नागरिकांनी बछडे पाहण्यासाठी गर्दी करू नये तसेच परिसरात वन्यप्राण्यांची हालचाल दिसल्यास तत्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन वनअधिकाऱ्यांनी केले आहे. जुन्नर तालुका हा बिबट्यांच्या वावरासाठी ओळखला जात असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे.

# खेडमध्ये सत्तासमीकरणांना वेग; सभापतीपदावरून चर्चांना उधाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर :** जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांनंतर आता खेड तालुक्यातील बाजार समिती व पंचायत समितीच्या सभापती-उपसभापती निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. येत्या आठवड्यात पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड होणार असल्याने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नवनिर्वाचित सदस्य राजकीय सहलीवर गेल्याने चर्चांना अधिक उधाण आले आहे.

नुकत्याच झालेल्या निवडणुकांत उबाठाने ने १६ पैकी ९ जागा जिंकत स्पष्ट वर्चस्व मिळवले. मात्र मागील पंचवार्षिक काळात सदस्यफुटीनंतर माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली सत्तांतर झाले होते. त्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर आमदार बाबाजी काळे यांनी सदस्यांना एकत्र ठेवण्याची रणनीती आखल्याचे मानले जात आहे.

पंचायत समितीत सभापतीपद सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झाले आहे. शिवसेनेच्या पाच महिला आणि चार पुरुष सदस्य निवडून आले आहेत. त्यामुळे सभापती महिला सदस्यांपैकीच एक होणार हे निश्चित असले तरी कोणाला पहिली संधी मिळणार याबाबत उत्सुकता आहे. उपसभापतीपदासाठी पुरुष सदस्यांमध्ये चुरस निर्माण झाली आहे. अंतिम निर्णय आमदार काळे यांच्या नेतृत्वाखाली होणार असल्याचे सांगितले जात आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीत पक्षाने ८ पैकी ५ जागांवर विजय मिळवला. बाजार समितीचे सभापती विजयसिंग शिंदे पाटील यांनी मतदारसंघाबाहेरून निवडणूक लढवत विजय मिळवला. पूर्वनियोजनानुसार ते खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदाचा राजीनामा देणार असल्याची चर्चा असून नव्या सभापती निवडीच्या हालचालींना वेग आला आहे. आमदार काळे यांचे भाचे आणि संचालक अनुराग जैद यांचे नाव पुढे येत आहे.

दरम्यान, आमदार काळे यांच्या भगिनी राजश्री जैद यांना पाईट-आंबेठाण गटातून पराभव पत्करावा लागला. त्या ठिकाणी सुनिता बुट्टे पाटील विजयी झाल्या.

या पार्श्वभूमीवर राजकीय समतोल साधण्यासाठी भाच्याला सभापतीपदाची संधी दिली जाऊ शकते, अशी चर्चा तालुक्यात रंगली आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे बाजार समितीतील सत्ता पूर्वी दिलीप मोहिते पाटील यांच्या प्रभावाखाली असली तरी आता ती आमदार काळे यांच्या गोटात झुकल्याचे चित्र आहे. काही संचालकांनीही आपली भूमिका बदलल्याने सत्तासंतुलन अधिक स्पष्ट झाले आहे. सभापती आणि उपसभापती निवडीनंतरच तालुक्यातील पुढील राजकीय दिशा ठरणार असल्याने राजकीय वातावरण तापलेले आहे.

# महाशिवरात्री यात्रा भाविकांविना

### श्री क्षेत्र भीमाशंकर येथे कडक बंदोबस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अवसरी :** श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर येथे यंदाची महाशिवरात्री यात्रा शिवभक्तांविना साजरी करण्यात आली. मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकासकामांमुळे भाविकांसाठी दर्शन खुले ठेवणे शक्य नसल्याने केवळ विधिवत पूजा व जलाभिषेक करून उत्सव पार पडला. अनादी काळापासून प्रथमच महाशिवरात्री यात्रेला खंड पडल्याची माहिती देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त मधुकर गवांदे यांनी दिली.

मंदिर परिसरात सध्या सुरक्षाविषयक आणि पायाभूत सुविधा उभारणीची कामे सुरू आहेत. महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता लक्षात घेता सुरक्षेच्या कारणास्तव मंदिर दर्शनासाठी खुले करता आले नाही. परिणामी, दरवर्षी 'हर हर महादेव'च्या जयघोषांनी दुमदुमणारा परिसर यंदा शांततेत होता.

भीमाशंकर मंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी सहावे ज्योतिर्लिंग मानले जाते. दरवर्षी महाशिवरात्रीला लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. यात्रेच्या आधी व नंतरही काही दिवस मोठी गर्दी होत असते. मात्र, यंदा विकासकामांमुळे भाविकांना प्रवेश नाकारण्यात आला.

दरम्यान, २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा नाशिक येथे होणार आहे. त्याआधी महाकुंभ मधील अनुभव लक्षात घेता नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात येणाऱ्या भाविकांकडून भीमाशंकर येथेही मोठी गर्दी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर २८८.१७ कोटी रुपयांच्या विस्तृत विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली असून गर्दी व्यवस्थापन व मूलभूत सुविधांसाठी कामे हाती घेण्यात येणार आहेत.

यात्रेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तरीही काही जणांनी परिसरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे यांनी दिला आहे.

# बेल्हा-जेजुरी महामार्गावर अपघातांची मालिका कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**लोणी-धामणी :** बेल्हा-जेजुरी राज्यमार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून लोणी (ता. आंबेगाव) परिसरात पुन्हा एक गंभीर अपघात घडला आहे. लोणी-पाबळ रस्त्यावरील बांधन-आदक वस्ती येथे शुक्रवारी (दि. १२) सायंकाळी सुमारे सात वाजता अज्ञात वाहनाने पाठीमागून दिलेल्या धडकेत बेबीताई ज्ञानेश्वर आदक (वय ५४) या गंभीर जखमी झाल्या.

लोणीच्या दिशेने येत असताना हा अपघात घडला. धडक इतकी तीव्र होती की त्यांच्या डाव्या पायाला फ्रॅक्चर झाले. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने मंचर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. सध्या त्यांच्यावर रिद्धी-सिद्धी हॉस्पिटल येथे उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

बांधन-आदक वस्ती परिसरात यापूर्वीही अनेक अपघात झाले असून दोन ते तीन जणांना प्राण गमवावे लागल्याची नोंद आहे. हा राज्यमार्ग दोन तालुक्यांना जोडणारा असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असते. वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसवावेत, अशी मागणी शरद बँकेचे संचालक अशोक आदक पाटील व सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब आदक यांनी केली आहे.

दरम्यान, आठच दिवसांपूर्वी लोणी येथील युनियन बँकेसमोरील वळणावर ऊसाच्या वाढ्या घेऊन जाणारा टेम्पो पलटी झाला होता. सुदैवाने पलटी होताना तो रस्त्यावर उभ्या असलेल्या क्रेनवर आदळल्याने मोठी जीवितहानी टळली. या वळणावरही गतिरोधक बसविण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब कोचर व सदस्या मंगल कैलास गायकवाड यांनी संबंधित विभागाकडे केली आहे. वारंवार घडणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

### शिरदाळ्यात ग्रामस्वच्छता अभियान

**लोणी-धामणी :** शिरदाळे (ता. आंबेगाव) येथे महाशिवरात्रीच्या निमित्ताने रविवारी (दि. १५) ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. गावातील तरुण मंडळी तळ्याच्या परिसरात आणि महादेव मंदिरासमोर एकत्र जमली होती. शिवरात्रीनिमित्त महादेव मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. महाप्रसादानंतर गावासाठी काहीतरी विधायक करण्याचा संकल्प तरुणांनी केला. तळ्याच्या कडेला पडलेला कचरा, रस्त्यालगत टाकलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या आणि इतर प्लास्टिक कचरा गोळा करून स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. महिन्यातून एक दिवस अशी मोहीम राबविल्यास परिसर स्वच्छ राहण्यास मदत होईल, अशी भावना आहे.

# आळंदी पंचक्रोशीत महाशिवरात्री उत्साहात

### सिद्धेश्वर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** महाशिवरात्रीनिमित्त आळंदी पंचक्रोशीतील विविध शिवमंदिरांमध्ये भक्तिमय वातावरणात धार्मिक कार्यक्रम पार पडले. पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरांमध्ये अभिषेक, पूजा व जलाभिषेकासाठी रांगा लावल्या.

येथील आळंदी परिसरातील सिद्धेश्वर मंदिर, वैतागेश्वर महाराज मंदिर, वाघेश्वर महाराज मंदिर, नागेश्वर महाराज मंदिर, महादेव बेली मंदिर, धनेश्वर महाराज मंदिर आदी शिवालयांमध्ये दिवसभर भाविकांची गर्दी उसळली होती. उपवास, अभिषेक आणि पारंपरिक पूजाविधी करून भाविकांनी महाशिवरात्र साजरी केली. विविध ठिकाणी प्रसादाचे वाटप करण्यात आले.

माऊली मंदिर परिसरात दिवसभर भाविकांची वर्दळ होती. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आळंदी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मंदिर परिसरात वाहन प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले. अनेक भाविकांनी दूरवर वाहने उभी करून पायी मंदिरात दर्शनासाठी हजेरी लावली.

इंद्रायणी आरती सेवा समितीतर्फे भक्त पुंडलिक मंदिरात 'हर हर महादेव'च्या जयघोषात आरती पार पडली. तसेच माऊली मंदिरात शिवसेना आळंदी शहर प्रमुख राहुल ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या पुढाकाराने २५१ लिटर मसाले दूध महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात हजारो भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला. अन्नदान परंपरेनुसार दूध, खिचडी, केळी आदींचे वाटप करण्यात आले. या वेळी विविध राजकीय व सामाजिक पदाधिकारी उपस्थित होते.

इंद्रायणी नदी घाटावरही आरतीचे आयोजन करण्यात आले. वैतागेश्वर महाराज मंदिर व भक्त पुंडलिक महाराज मंदिर येथे महिला भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सिध्दबेट परिसरातील शिवमंदिरातही भाविकांची लक्षणीय उपस्थिती होती. संपूर्ण परिसर शिवभक्तीने दुमदुमून गेला होता.

माऊली मंदिरात पहाटे अभिषेक, महानैवेद्य, कीर्तन तसेच ब्रह्मवृंदांच्या वतीने रुद्राभिषेक पार पडला.

देवस्थानचे मुख्य व्यवस्थापक माऊली वीर व उपव्यवस्थापक तुकाराम माने यांनी सेवक व सुरक्षा रक्षकांच्या मदतीने दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवली. कमी वेळेत अधिकाधिक भाविकांना दर्शनाचा लाभ देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### १,८६० कोटींची थकबाकी; साखर आयुक्तांची नोटीस; आज आणि उद्या सुनावणी

# थकीत एफआरपीप्रश्नी ४५ साखर कारखाने रडारवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देय असलेल्या रास्त आणि किफायतशीर दराच्या (एफआरपी) थकबाकीप्रश्नी ४५ साखर कारखाने साखर आयुक्तालयाच्या रडारवर आले आहेत. एफआरपीची ६० टक्क्यांपेक्षा कमी रक्कम अदा केलेल्या या कारखान्यांना साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी नोटिसा बजावल्या असून येत्या मंगळवार व बुधवार (दि. १७ व १८) रोजी सलग दोन दिवस सुनावण्या ठेवण्यात आल्या आहेत. संबंधित कारखान्यांकडे सुमारे १ हजार ८६० कोटी रुपयांची रक्कम थकीत असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

राज्यातील २०२५-२६ च्या गाळप हंगामात ३१ जानेवारीअखेरच्या ताज्या पंधरवडा अहवालानुसार, उसाच्या तोडणी व वाहतूक खर्चासह एफआरपीची एकूण ४ हजार २५२ कोटी रुपये रक्कम अद्याप थकीत आहे. हंगाम अंतिम टप्प्यात पोहोचत असतानाही काही कारखान्यांनी अत्यल्प रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली आहे.

साखर आयुक्तालयाच्या अहवालानुसार दोन सहकारी आणि दोन खासगी साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना एफआरपीचा एकही रुपया अदा केलेला नाही. या कारखान्यांनी शंभर टक्के रक्कम थकीत ठेवली असून ती कधी अदा केली जाणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

थकीत एफआरपीप्रश्नी सुनावणीसाठी नोटिसा बजावलेल्या कारखान्यांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील ११ आणि अहिल्यानगरमधील ९ कारखान्यांचा समावेश आहे. सातारा जिल्ह्यातील ५, बीड व परभणी येथील प्रत्येकी ३ कारखाने यामध्ये आहेत. नाशिक, पुणे, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या चार जिल्ह्यांतील प्रत्येकी दोन कारखान्यांचा समावेश असून लातूर, नांदेड, धाराशिव, हिंगोली, यवतमाळ आणि सांगली या सहा जिल्ह्यांतील प्रत्येकी एका कारखान्यालाही नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत.

दरम्यान, ३१ जानेवारीअखेरच्या अहवालानुसार ४१ कारखान्यांनी एफआरपीची शंभर टक्के किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम अदा केली आहे. ८० ते ९९ टक्के रक्कम ७५ कारखान्यांनी, ६० ते ८० टक्के रक्कम ४४ कारखान्यांनी दिली आहे. मात्र शून्य ते ६० टक्क्यांपर्यंतच रक्कम अदा केलेल्या ४५ कारखान्यांची भूमिका सुनावणीत स्पष्ट होणार आहे.

राज्यातील एकूण थकीत रक्कम ४ हजार २५२ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असताना शेतकरी संघटनांची तुलनेने शांत भूमिका आश्चर्यकारक मानली जात आहे. सुनावणीनंतर संबंधित कारखान्यांवर कोणती कारवाई होते, याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

आगामी आठवड्यातही अशीच आवक राहिल्यास बाजारातील दरांमध्ये चढ-उतार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# डिंभेच्या उजव्या कालव्याला पाणी सोडण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** कुकडी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या डिंभे धरण येथून उजव्या कालव्याला तातडीने पाणी सोडावे, अशी मागणी नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्या अंकिता अनिल वाळूंज यांनी केली आहे.

उन्हाचा कडाका वाढू लागला असून आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील तसेच शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील शेती पिकांना पाण्याची तीव्र गरज भासू लागली आहे. यंदा पावसाचे प्रमाण चांगले झाले असले तरी भूजलपातळी झपाट्याने खालावत असल्याने अनेक ठिकाणी विहिरी, कुपनलिका आणि तलावांतील पाणी कमी होत आहे. परिणामी शेतकऱ्यांना सिंचनासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. आंबेगावच्या पूर्व आणि शिरूरच्या पश्चिम भागाला डिंभेच्या उजव्या कालव्यातून पाणीपुरवठा केला जातो. या कालव्यामुळे परिसरातील शेती बागायती स्वरूपाची झाली आहे. सध्या पाणीअभावी पिके सुकण्याच्या मार्गावर असल्याने आवर्तन तातडीने सोडावे, अशी मागणी वाढत आहे. पंचायत समिती सदस्या अंकिता वाळूंज, वाळूंजनगरच्या सरपंच तृप्ती महेंद्र वाळूंज तसेच जारकरवाडीचे उपसरपंच सचिन टाव्हरे यांनी जलसंपदा विभागाकडे निवेदन दिले आहे.

## सारांश वृत्त

### बेंगळुरू विमानतळावर गांजासह अटक

**बंगळुरू :** येथील केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर बँकॉकहून आलेल्या एका प्रवाशाला ६.९८ किलो हायड्रोपोनिक गांजा, ज्याची किंमत २.४४ कोटी रुपये आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. आरोपीला १३ फेब्रुवारी रोजी एनडीपीएस कायद्यांतर्गत अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. कस्टम्सने बँकॉकहून येणाऱ्या एका प्रवाशाला रोखले आणि चेक-इन केलेल्या बॅगेजमध्ये कुकीजच्या पॅकेटमध्ये लपवून ठेवलेला २.४४ कोटी रुपये किमतीचा ६.९८ किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त केला.

### कर्नाटकातील चार न्यायालयांना धमक्या

**बेंगळुरू :** कर्नाटक उच्च न्यायालयाच्या धारवाड खंडपीठ आणि मंड्या, कोडगू तसेच बेंगळुरू दक्षिण येथील जिल्हा न्यायालयात बॉम्बची धमकी देणारा ईमेल पाठवण्यात आला होता, ज्यामुळे अधिकाऱ्यांना सोमवारी व्यापक शोध मोहीम राबवावी लागली, असे पोलिसांनी सांगितले. खबरदारीचा उपाय म्हणून, धारवाड, मंड्या आणि बेंगळुरू दक्षिण आणि कोडगु जिल्ह्यातील न्यायालयीन इमारतींमधून वकील आणि कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यात आले, असे त्यांनी सांगितले. पोलिसांनी सांगितले की, सुरक्षा कर्मचाऱ्यांनी परिसराला वेढा घातला आणि कसून तपासणी केली.

### ड्रग्ज तस्करांचा पोलिसांवर हल्ला

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आणि वाहतूक वाहतुकीत पोलिसांना मदत करणारे दोन नागरी स्वयंसेवक सोमवारी मालदा जिल्ह्यात संशयित ड्रग्ज तस्करांनी केलेल्या हल्ल्यात जखमी झाले, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. माणिकचक परिसरात छापा टाकताना नागरी स्वयंसेवकांचा समावेश असलेल्या पोलिस पथकावर दगडफेक करण्यात आल्याने ही घटना घडली, असे त्यांनी सांगितले.

## ७ एप्रिलपासून सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी

# धार्मिक स्थळांवरील महिलांचे प्रवेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केरळमधील शबरीमाला मंदिर तसेच विविध धर्मांतील धार्मिक स्थळांवर महिलांच्या प्रवेशावरील निर्बंधांशी संबंधित याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाचे नऊ सदस्यांचे घटनापीठ ७ एप्रिलपासून अंतिम सुनावणी सुरू करणार आहे. सोमवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने याबाबतची रूपरेषा जाहीर केली.




सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठाने सांगितले की, या प्रकरणांवरील सविस्तर युक्तिवाद ७ एप्रिलपासून सुरू होतील आणि २२ एप्रिलपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. संबंधित पक्षांना १४ मार्चपर्यंत लेखी निवेदन सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

केंद्र सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी बाजू मांडताना, सर्व वयोगटातील महिलांना प्रवेश देण्याच्या २०१८ च्या निकालाच्या पुनर्विचाराला सरकारचा पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले. न्यायालयाने पुनरावलोकनाला समर्थन देणाऱ्या पक्षांसाठी अधिवक्ता कृष्ण कुमार सिंह यांची नोडल वकील म्हणून नियुक्ती केली, तर विरोधकांच्या बाजूने शाश्वती परी यांची नियुक्ती करण्यात आली. वरिष्ठ वकील के. परमेश्वर आणि शिवम सिंग यांची अमिकस क्युरी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून ते न्यायालयासमोर सर्व मुद्द्यांचा आढावा मांडणार आहेत.

न्यायालयाच्या आदेशानुसार, ७ ते ९ एप्रिलदरम्यान पुनर्विचार याचिकाकर्त्यांचे युक्तिवाद ऐकले जातील. १४ ते १६ एप्रिलदरम्यान विरोधकांची बाजू मांडली जाईल. २१ एप्रिल रोजी प्रत्युत्तर युक्तिवाद होणार असून त्यानंतर अमिकस क्युरीकडून अंतिम मांडणी केली जाईल. सुनावणी २२ एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

११ मे २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की, पुनरावलोकन अधिकारक्षेत्राचा मर्यादित वापर करताना पाच न्यायाधीशांचे खंडपीठ कायद्याचे महत्त्वाचे प्रश्न मोठ्या खंडपीठाकडे पाठवू शकते. त्याआधी १४ नोव्हेंबर २०१९ रोजी, २०१८ च्या निकालाशी संबंधित पुनरावलोकन याचिकांवर थेट निर्णय न देता प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे पाठवण्यात आल्याबाबतचे आक्षेप न्यायालयाने फेटाळले होते. २०१८ च्या निकालानुसार सर्व वयोगटातील महिलांना सबरीमाला मंदिरात प्रवेश देण्यास परवानगी देण्यात आली होती.

धार्मिक स्वातंत्र्याच्या व्याप्तीबाबत विविध धर्मांच्या संदर्भात सात महत्त्वाचे प्रश्न निश्चित करण्यात आले आहेत. या मुद्द्यांमध्ये आवश्यक असल्यास भर किंवा वगळण्याची मुभा ठेवण्यात आली आहे. कोणत्याही विशिष्ट धार्मिक पंथाशी संबंधित नसलेली व्यक्ती जनहित याचिका दाखल करून त्या पंथाच्या प्रथांवर प्रश्न उपस्थित करू शकते का, याचाही विचार होणार आहे.

शबरीमाला प्रकरणासोबतच मुस्लिम महिलांना मशिदी आणि दर्ग्यांमध्ये प्रवेश, तसेच पारसी नसलेल्या पुरुषाशी विवाह केलेल्या पारसी महिलांना अग्निस्थळात प्रवेश नाकारणे या मुद्द्यांचाही मोठ्या खंडपीठासमोर एकत्रितपणे विचार होणार आहे.

## हेमंता सरमा विरोधातील याचिका सुनावणीस नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (१६ फेब्रुवारी) आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सर्मा यांच्यावर द्वेषपूर्ण भाषणाच्या आरोपांवर कारवाई करण्याची मागणी करणारी याचिका सुनावणीस नाकारली. भारताचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने याचिकाकर्त्यांना प्रथम गुवाहाटी उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला.

ही याचिका सीपीआय (एम) नेत्या ॲनी राजा आणि आसामी विद्वान हिरेन गोहेन यांनी दाखल केली होती. यामध्ये मुख्यमंत्री सर्मा यांच्यावर पोलिसांनी गुन्हा नोंदवावा, असे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली होती.

याचिकेत नमूद घटनांमध्ये सत्ताधारी भारतीय जनता पक्ष (भाजप) च्या आसाम युनिटने प्रसारित केलेल्या एका व्हिडिओचा उल्लेख आहे. या व्हिडिओमध्ये मुख्यमंत्री सर्मा मुस्लिमांच्या छायाचित्रावर गोळीबार करताना दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच 'मिया' आणि बंगाली भाषिक मुस्लिमांविषयी केलेल्या कथित टिप्पण्यांवरही आक्षेप घेण्यात आला आहे. भाजपकडून या समुदायाला 'बेकायदेशीर घुसखोर' म्हटल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठाने विचारले की, याचिकाकर्त्यांनी थेट सर्वोच्च न्यायालयात धाव का घेतली. "प्रथम गुवाहाटी उच्च न्यायालयात का गेला नाहीत?" असा सवाल करत सरन्यायाधीशांनी निवडणुकीपूर्वी थेट सर्वोच्च न्यायालयात येण्याची प्रवृत्ती धोकादायक असल्याचे निरीक्षण नोंदवले. खंडपीठाने नमूद केले की, संबंधित मुद्द्यांवर गुवाहाटी उच्च न्यायालय निर्णय देऊ शकते. यात हस्तक्षेप करण्याचे कारण दिसत नसल्याचे म्हटले आहे.

## व्यापार करारावरून काँग्रेसची टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत-अमेरिका अंतरिम व्यापार कराराला मान्यता देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासमोर "शरणागती पत्करली" असल्याचा घणाघाती आरोप काँग्रेसने सोमवारी केला. या करारामुळे राज्यांतील कोट्यवधी शेतकऱ्यांचे जीवनमान उद्ध्वस्त होण्याची भीती व्यक्त करत केंद्र सरकारने देशाच्या सार्वभौमत्वाशी तडजोड केल्याचा दावा काँग्रेस नेत्यांनी केला.

काँग्रेसचे सरचिटणीस रणदीप सुरजेवाला यांनी पत्रकार परिषदेत बोलताना म्हटले की, व्यापार करार हा समान अटींवर आणि परस्पर सार्वजनिक हितावर आधारित असावा. "देशाच्या सार्वभौमत्वाचे बलिदान देऊन कोणताही व्यापार करार गुलामगिरीचा मार्ग ठरू नये. राष्ट्रीय आणि सार्वजनिक हितांचा बळी देऊन आर्थिक प्रगती साधता येत नाही," असे ते म्हणाले.

या पत्रकार परिषदेतील सुरजेवाला यांच्या विधानाला दुजोरा देत काँग्रेसचे संवाद प्रभारी सरचिटणीस जयराम रमेश यांनी सामाजिक माध्यमांवर प्रतिक्रिया दिली. "पंतप्रधानांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासमोर पूर्णपणे शरणागती पत्करली आहे. जसे त्यांनी १० मे २०२५ रोजी अचानक आणि अनपेक्षितपणे 'ऑपरेशन सिंदूर' थांबवले होते," असा उल्लेख त्यांनी केला. या करारामुळे विविध राज्यांतील लाखो शेतकऱ्यांवर प्रतिकूल परिणाम होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सुरजेवाला यांनी आरोप केला की, अमेरिका-भारत व्यापार कराराद्वारे मोदी सरकारने भारतीय शेती आणि शेतकऱ्यांच्या हिताचे बळी दिले आहेत. भारताच्या हिताचे रक्षण करण्यासाठी ठामपणे उभे राहण्याऐवजी सरकारने स्वावलंबनाशी तडजोड केली. हा 'आत्मनिर्भर भारत' आहे की 'अमेरिका-निर्भर भारत'?" असा सवाल सुरजेवाला यांनी केला.

## मणिशंकर अय्यर यांच्या विधानापासून फारकत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील प्रमुख विरोधी पक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ने पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री मणिशंकर अय्यर यांच्या अलीकडील विधानापासून स्पष्टपणे अंतर राखले आहे. अय्यर यांनी केरळमध्ये डाव्या आघाडीचे नेते पिनारायी विजयन हेच पुन्हा मुख्यमंत्री राहतील, असे वक्तव्य केले होते.

या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना काँग्रेसचे मीडिया व प्रचार विभाग प्रमुख पवन खेरा यांनी सांगितले की, "श्री. मणिशंकर अय्यर यांचा गेल्या काही वर्षांपासून काँग्रेस पक्षाशी कोणताही संबंध नाही. ते पूर्णपणे त्यांच्या वैयक्तिक क्षमतेनुसार बोलतात आणि लिहितात."

केरळ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अय्यर यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) नेतृत्वाखालील सरकार कायम राहील, असे मत व्यक्त केले होते. त्यावर काँग्रेसने अधिकृत भूमिका स्पष्ट करत या मताशी पक्षाचा संबंध नसल्याचे अधोरेखित केले. पवन खेरा यांच्या वक्तव्यानंतर काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनीही प्रतिक्रिया नोंदवली. त्यांनी सामाजिक माध्यमांवर लिहिले की केरळचे मतदार अधिक जबाबदार आणि प्रतिसादक्षम प्रशासनासाठी युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (यूडीएफ) ला पुन्हा सत्तेत आणतील. तसेच, डाव्या आघाडी आणि भाजप यांच्यात गुप्त सहकार्य असल्याचा आरोपही त्यांनी केला. तिरुअनंतपुरम येथे आयोजित "व्हिजन २०३१: डेव्हलपमेंट अँड डेमोक्रसी" या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना अय्यर यांनी पंचायती राज व्यवस्थेत केरळ अव्वल असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री पिनारायी विजयन उपस्थित होते.

यूपीए सरकारच्या काळात (२००४-२००९) केंद्रीय पंचायती राज मंत्री म्हणून काम केलेल्या अय्यर यांनी महात्मा गांधी यांच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेचा उल्लेख करत केरळ हे त्या दृष्टिकोनाला साकार करणारे राज्य असल्याचे म्हटले. "सर्वात गरीब व्यक्तीलाही मालकीची भावना आणि राष्ट्रनिर्मितीत प्रभावी आवाज मिळावा, ही गांधीजींची कल्पना होती. केरळने त्या दिशेने उल्लेखनीय प्रगती केली आहे," असे ते म्हणाले.

याशिवाय, केरळने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पंचायती राजविषयक अपेक्षाही मोठ्या प्रमाणात पूर्ण केल्याचे अय्यर यांनी नमूद केले. तथापि, त्यांच्या या भूमिकेमुळे काँग्रेसमध्ये नाराजी निर्माण झाली असून पक्षाने अधिकृतपणे त्यांच्याशी संबंधितता नसल्याचे स्पष्ट केले आहे.

## गुजरातमध्ये ३४ शाळांना बॉम्बधमकीचे ई-मेल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद :** गुजरातमधील ३४ शाळांना सोमवारी सकाळी बॉम्बस्फोटाच्या धमकीचे ई-मेल आल्याने राज्यात एकच खळबळ उडाली. यामध्ये वडोदऱ्यातील १९ आणि अहमदाबादमधील १५ शाळांचा समावेश आहे. धमकीनंतर तातडीने शाळा रिकाम्या करण्यात आल्या, पालकांची मोठी गर्दी झाली आणि पोलिसांनी व्यापक शोधमोहीम राबवली.

ई-मेलमध्ये भारताच्या फाळणीचा उल्लेख करणाऱ्या भडकाऊ ओळींसह पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे संदर्भ असल्याचा आरोप आहे. काही संदेशांमध्ये "गुजरात ... होईल" असा इशाराही देण्यात आल्याचे समोर आले. मात्र सखोल तपासणीत कोणतीही संशयास्पद वस्तू अथवा स्फोटके आढळली नाहीत. धमकी मिळताच स्थानिक पोलिस, बॉम्ब शोध पथके आणि अग्निशमन दलाच्या टीमांनी समन्वयाने कारवाई सुरू केली. प्रत्येक वर्गखोली, कॉरिडॉर आणि कॅम्पसचा कोपरा तपासण्यात आला. खबरदारी म्हणून विद्यार्थ्यांना सुरक्षितरीत्या घरी पाठवण्यात आले.

घटनेची गांभीर्याने दखल घेत गुजरातचे गृह राज्यमंत्री हर्ष संघवी यांनी राज्याच्या डीजीपींना तातडीने कारवाईचे निर्देश दिले. अशा प्रकारच्या धमक्यांबाबत शून्य सहनशीलतेची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आणि दोषींवर कठोर कारवाईचा इशारा दिला. अहमदाबादचे जिल्हा शिक्षण अधिकारी रोहित चौधरी यांनी १५ हून अधिक शाळांना धमकीचे ई-मेल आल्याची पुष्टी केली. पोलिसांशी समन्वय साधून तपास सुरू असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत काळजीचे कारण नसल्याचे त्यांनी सांगितले. वडोदऱ्यात जिल्हा शिक्षण अधिकारी महेश पांडे यांनी शहर आणि जिल्ह्यातील सुमारे १८ शाळांना ई-मेलद्वारे लक्ष्य करण्यात आल्याचे सांगितले.

## डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायद्याच्या वैधतेवर सुनावणी

# अंतरिम स्थगिती देण्यास नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा, २०२३ मधील विविध तरतुदींच्या संवैधानिक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांची सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालय यांनी सोमवारी सहमती दर्शवली. मात्र, वादग्रस्त तरतुदींवर तात्पुरती स्थगिती देण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला.

"अंतरिम आदेशाद्वारे, आम्ही जोपर्यंत सविस्तर सुनावणी करत नाही तोपर्यंत संसदेने लागू केलेल्या कायदेविषयक व्यवस्थेला उलथवून टाकणार नाही," असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची व विपुल एम. पंचोली यांच्या समावेश असलेल्या खंडपीठाने केंद्र सरकारला नोटीस बजावली. या याचिका डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा तसेच २०२५ मधील नियमांतील काही तरतुदींना आणि माहिती अधिकार कायद्यात करण्यात आलेल्या सुधारणांना आव्हान देतात.



डिजिटल न्यूज प्लॅटफॉर्म 'द रिपोर्टर्स कलेक्टिव्ह', पत्रकार नितीन सेठी आणि नॅशनल कॅम्पेन फॉर पीपल्स राईट टू इन्फॉर्मेशन यांच्या वतीने व्यंकटेश नायक यांनी दाखल केलेल्या तीन याचिका मोठ्या खंडपीठाकडे पाठवण्यात आल्या आहेत. याचिकांमध्ये विशेषतः त्या तरतुदींवर आक्षेप घेण्यात आला आहे, ज्याअंतर्गत केंद्र सरकारला आपल्या विवेकाधिकाराने कोणत्याही डेटा विश्वस्ताकडून माहिती मागवण्याचा अधिकार दिला आहे. खंडपीठाने नमूद केले की हे प्रकरण "जटिल आणि संवेदनशील मुद्द्यांशी" संबंधित असून माहितीचा अधिकार आणि गोपनीयतेचा अधिकार या दोन मूलभूत अधिकारांमधील संतुलन साधण्याचा प्रश्न यात आहे.

"हे स्पर्धात्मक हितसंबंधांचे संतुलन साधण्याबद्दल आहे. वैयक्तिक माहितीची व्याख्या आणि त्यातील मर्यादा स्पष्ट कराव्या लागतील," असे सरन्यायाधीशांनी निरीक्षण नोंदवले.

याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडताना ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी सुभाष अग्रवाल प्रकरणातील ऐतिहासिक निर्णयाचा संदर्भ देत माहितीचा अधिकार आणि गोपनीयतेतील संतुलनाबाबत आधीच न्यायालयाने मार्गदर्शक चौकट निश्चित केल्याचे सांगितले. मात्र, खंडपीठाने नवीन कायदेविषयक चौकटीसाठी स्वतंत्र आणि सखोल परीक्षण आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

ज्येष्ठ वकील अभिषेक सिंघवी यांनी अतिरिक्त मांडणी करण्याचा प्रयत्न केला असता, केंद्राचा सविस्तर प्रतिसाद येणे आवश्यक असल्याचे सांगत न्यायालयाने नोटीस बजावली. या प्रकरणाची पुढील सुनावणी मार्चमध्ये होणार आहे.

## २०२६ पर्यंत माओवाद संपवणार : अमित शहा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोमवारी जाहीर केले की २०२९ पर्यंत जम्मू-काश्मीर आणि ईशान्येकडील राज्यांमधून दहशतवाद व बंडखोरी पूर्णपणे नष्ट करण्यात येईल. तसेच ३१ मार्च २०२६ पर्यंत देशाला माओवादी हिंसाचारापासून मुक्त करण्याचे सरकारचे उद्दिष्ट असल्याची पुनरुच्चार त्यांनी केला.

नवी दिल्ली येथे आयोजित दिल्ली पोलिसांच्या ७९ व्या स्थापना दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना शहा यांनी राष्ट्रीय राजधानीसाठी "सेफ सिटी" प्रकल्पासह दहा नव्या उपक्रमांची घोषणा केली. या प्रकल्पांतर्गत दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाचे एकात्मिक मुख्यालय दहशतवादविरोधी कारवायांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे त्यांनी सांगितले.

"सुमारे २,१०० कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम कॅमेरे लवकरच कार्यान्वित होतील. हे सेफ सिटी प्रकल्पांतर्गत १०,००० कॅमेऱ्यांच्या मोठ्या जाळ्याचा भाग असतील. याशिवाय सार्वजनिक सुरक्षेसाठी शहरात आधीच बसवलेले १५,००० कॅमेरे या यंत्रणेशी जोडले जात आहेत," अशी माहिती त्यांनी दिली.

२०१४ पूर्वी देशाच्या अंतर्गत सुरक्षेसमोर गंभीर आव्हाने होती, विशेषतः जम्मू-काश्मीर, ईशान्य आणि माओवादग्रस्त भागांमध्ये, असे नमूद करत शहा म्हणाले, "यापैकी सुमारे ८० टक्के समस्या नियंत्रणात आणल्या आहेत. माओवादी हिंसाचार पूर्णपणे संपवण्याच्या उंबरठ्यावर आपण आहोत. ३१ मार्च २०२६ पर्यंत देशाला माओवाद्यांच्या धोक्यांपासून मुक्त करण्याचे आमचे लक्ष्य आहे."

ईशान्य भारतात बंडखोर गटांबरोबर जवळपास २० शांतता करार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

१०,००० हून अधिक तरुणांनी शस्त्रे टाकून मुख्य प्रवाहात सहभाग घेतल्याचेही त्यांनी नमूद केले. कलम ३७० अंतर्गत जम्मू-काश्मीरला दिलेला विशेष दर्जा रद्द केल्यानंतर केंद्रशासित प्रदेशातील सुरक्षा परिस्थितीत टप्प्याटप्प्याने सुधारणा होत असल्याचा दावा त्यांनी केला. "२०२९ पर्यंत जम्मू-काश्मीर आणि ईशान्य पूर्णपणे हिंसाचारमुक्त होतील, याची मी देशवासीयांना खात्री देतो," असे त्यांनी स्पष्ट केले.

## बनावट ऑनलाइन रॅकेटचा पर्दाफाश

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरच्या गंदरबल जिल्ह्यात पोलिसांनी कोट्यवधी रुपयांच्या बनावट ऑनलाइन गुंतवणूक रॅकेटचा पर्दाफाश केला आहे आणि मुख्य सूत्रधारासह आठ जणांना अटक केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले. "जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी एका बहु-राष्ट्रीय, बहु-कोटी रुपयांच्या ऑनलाइन गुंतवणूक घोटाळ्याचा शोध लावण्यात यश मिळवले, ज्यामध्ये फिशिंग आणि बनावट ट्रेडिंग प्लॅटफॉर्मचा वापर करण्यात आला होता.

## हायकमांडच्या आदेशाने भूपेन बोरांनी घेतली माघार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुवाहाटी :** पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाच्या हस्तक्षेपानंतर भूपेन बोरा यांनी सोमवारी आपला राजीनामा मागे घेतला. ही माहिती अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे आसाम प्रभारी जितेंद्र सिंह यांनी दिली.

बोरा यांनी आदल्या दिवशी पक्षाच्या उच्च कमांडकडे राजीनामा सादर केल्याचे पत्र पाठवले होते. या पार्श्वभूमीवर जितेंद्र सिंह आणि आसाम प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष गौरव गोगोई यांच्यासह वरिष्ठ नेत्यांनी बोरा यांच्या निवासस्थानी जाऊन चर्चा केली.

चर्चेनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना भूपेन बोरा यांनी सांगितले की त्यांनी आपल्या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी पक्ष नेतृत्वाकडे अधिक वेळ मागितला आहे. राहुल गांधी यांनी त्यांच्याशी वैयक्तिक संवाद साधल्यानंतर पक्षाने त्यांचा राजीनामा स्वीकारलेला नाही, असे संकेत मिळाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, गौरव गोगोई यांनी पक्षातील अलीकडील घडामोडींमुळे काही गैरसमज निर्माण झाले असतील तर त्याबद्दल खेद व्यक्त केला. "भूपेन बोरा दुखावले गेले असतील तर पक्षाने त्यांची माफी मागितली आहे," असे ते म्हणाले. या घटनाक्रमामुळे आसाम काँग्रेसमधील अंतर्गत तणाव काही प्रमाणात निवळल्याचे मानले जात आहे.

## दोषींवर कारवाईची अखिलेश यादव यांची मागणी

# विशेष सघन पुनरावृत्तीत मोठ्या गैरप्रकारांचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ :** उत्तर प्रदेशातील मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्ती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप करत अखिलेश यादव यांनी सोमवारी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याची मागणी केली.

पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना समाजवादी पक्षाचे अध्यक्ष म्हणाले की, पक्ष लवकरच भारत निवडणूक आयोग यांची भेट घेणार असून मंगळवारी सविस्तर निवेदन सादर करणार आहे. कोणत्या नियमांनुसार एफआयआर दाखल करावेत आणि चुकीच्या पद्धतीने नावे वगळल्यास संबंधितांवर कोणती कारवाई होणार, हे स्पष्ट करण्याची मागणी या निवेदनात केली जाईल, असे त्यांनी सांगितले.





निवडणूक आयोगाने आतापर्यंत कोणतीही ठोस कारवाई का केली नाही, असा सवाल उपस्थित करत यादव म्हणाले की आयोगाची भेट झाल्यानंतर हा मुद्दा विधानसभेतही उपस्थित केला जाईल. फॉर्म ७ द्वारे नावे वगळण्याची प्रक्रिया केवळ बूथ लेव्हल ऑफिसरमार्फतच सुरू व्हावी, इतर कोणत्याही व्यक्तीकडून नव्हे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच संबंधित विधानसभा मतदारसंघ, बूथ क्रमांक आणि फॉर्म ७ सादर करणाऱ्या व्यक्तीची माहिती सार्वजनिक करण्याचीही त्यांनी मागणी केली. यादव यांनी आरोप केला की पक्षाच्या समर्थकांची नावे बनावट मार्गांनी वगळली जात आहेत आणि आयोगाकडून अत्यंत मर्यादित माहिती दिली जात आहे.

महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या, कायदा-सुव्यवस्था, व्यापार करार, रुपयाचे अवमूल्यन आणि वाढत्या सोन्या-चांदीच्या किमती यांसारख्या मुद्द्यांवरून लक्ष विचलित करण्यासाठी हा प्रकार होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

फॉर्म ७ संदर्भातील आकडेवारी देताना यादव म्हणाले की राज्यात सपाने केवळ ४७ फॉर्म दाखल केले, तर भाजपने १,७२९ आणि "अज्ञात व्यक्तींनी" १,२८,६५९ फॉर्म सादर केले. हे अज्ञात व्यक्ती भाजपशी संबंधित असून जबाबदारी टाळण्यासाठी अशा नावांचा वापर होत असल्याचा त्यांचा आरोप आहे.

"तार्किक विसंगती"च्या नावाखाली मतदारांना त्रास देऊ नये, असे सांगत त्यांनी उदाहरण दिले की शहरात काम करणाऱ्या व्यक्तीला त्याच्या आजी-आजोबांच्या वयातील फरक स्पष्ट करण्यासाठी वेळ नसतो; तो डिजिटल त्रुटी असू शकतो. सर्व कागदपत्रे सादर केल्यानंतरही त्रुटी कशा निर्माण होतात, याचे स्पष्टीकरण सरकारने द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. निवडणूक आयोग भाजपच्या दबावाखाली काम करत आहे का, असा प्रश्न विचारल्यावर यादव यांनी तीव्र प्रतिक्रिया देत "आयोगाने आपल्या कार्यालयावर भाजपचा झेंडा लावावा," अशी टीका केली.